पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी ४११०१८. लेखा विभाग

क्रमांक:-लेखा/पेन्शन/३२/कावि/५६९५/२०२१

दिनांक:- ५ /९/२०२१

विषय:- सेवानिवृत्ती वेतन/कुटुंब निवृत्तीवेतन प्रकरणे वेळेत सादर करणे बाबत..

संदर्भ:- १) परिपत्रक क्र लेखा/३२/कावि/३७/२०१४ दि.७/२/२०१४

२) परिपत्रक क्र लेखा/३२/कावि/४८/२०१५ दि.१८/२/२०१५

३) परिपत्रक क्र लेखा/३२/कावि/१३/२०१७ दि.३१/१/२०१७

४) परिपत्रक क्र लेखा/पेन्शन/३२/कावि/४०६२/२०१९ दि.२/४/२०१९

५) परिपत्रक क्र लेखा/पेन्शन/२३/कावि/६५१/२०२० दि.१७/१/२०२०

परिपत्रक,

महाराष्ट्र नागरी सेवानिवृत्ती वेतन नियम १९८२ नुसार शासकीय कर्मचारी सेवेतून नियत वयोमान सेवानिवृत्ती, स्वेच्छा सेवानिवृत्ती, कुटुंब निवृत्तीवेतन, वैदयकीय सेवानिवृत्ती, सक्तीने सेवानिवृत्ती इ.सर्व प्रकारणे सेवनिवृत्ती वेतन व इतर लाभ अदा करणेकामी लेखा विभागाकडे प्राप्त होत असतात. अशी प्रकरणे वेळेत सादर करणेबाबत यापूर्वी संदर्भीय परिपत्रकान्वये वेळोवेळी कळविले आहे. तथापी संबंधीत विभागांकडून निवृत्तीवेतन/कुटुंब निवृत्तीवेतन मंजूरीबाबत चेकलिस्ट प्रमाणे अचूक व परिपूर्ण प्रकरणे वेळेत लेखा विभागात प्राप्त होत नाहीत. उदा.१) सेवानोंद पुस्तकातील नोंदी अदयावत न करणे. २) निवृत्ती/कुटुंब वेतन फॉर्म अचूक व परिपूर्ण न भरणे. ३) अंतिम वेतन, अर्हताकारी सेवा/अनअर्हताकारी सेवा तपशील, कर्ज वसूली, जादा वेतन वसूली इ. तपशीलाबाबत त्रुटी/चुका असणे. अशी प्रकरणे त्रुटींची पुर्तता करणेकामी संबंधीत विभागाकडे परत पाठविली जातात. परिणामी सेवानिवृत्त कर्मचा-यांना/मयत कर्मचा-यांचे वारसांना वेळेत निवृत्तीवेतन, सेवा उपदान/कुटुंब निवत्तीवेतन, मृत्यु उपदान इ. रक्कमा मंजूर करुन वेळेत अदा करता येत नाही.

काही कर्मचारी पेन्शन प्रकरणे विलंबाने मंजूर होत असल्याने, देय रक्कमा व्याजासहीत मिळणे बाबत मागणी करत आहेत. तसेच कर्मचारी महासंघाची दिनांक ५/६/२०२१ रोजी मिटींग आयोजित करणेत आली होती. त्यामध्ये कर्मचारी महासंघाने सेवा निवृत्तीनंतरच्या देय रक्कमा कर्मचा-यांना/वारसांना वेळेत मिळत नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे.

सबब सदर परिपत्रकाद्वारे सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना सुचित करणेत येते की, सर्व निवृत्ती/कुटुंब निवृत्तीवेतन प्रकरणे मु.ले.प. विभागाकडून तपासून तसा दाखला घेऊन स्पष्ट अभिप्रायासह परिपूर्ण प्रकरणे १ महिना आगोदर लेखा विभागाकडे सादर करावीत. यापुढे संबंधीतांना वेळेत देय रक्कमा मिळाल्या नाहीत किंवा त्यानुषंगाने तक्रारी आल्यास, त्यास लेखा विभाग जबाबदार राहणार नाही. महाराष्ट नागरी सेवानिवृत्ती वेतन नियम १९८२ मधील कलम १२९ (अ) १२९ (ब) नुसार त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विभागाची राहील याची सर्व विभाग प्रमुखांनी/शाखा प्रमुखांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

सही/-
(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.

प्रति,
सर्व संबंधीत विभागप्रमुख/शाखाप्रमुख

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८.